# पुणे विद्यापीठ

**परिपत्रक क्रमांक : ६७/ २०१४**

**फक्त संलग्नित सर्व मान्यताप्राप्त संशोधन केंद्रांकरिता**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्रांमध्ये एम. फिल अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना दरमहा रु. ३०००/— व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांना दरमहा रु. ६०००/— खालील नियम व अटींनुसार शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

१) एम. फिल. अभ्यासक्रमासाठी सन २०१३—१४ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नावनोंदणी झालेल्या दिनांकापासून/तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) देण्यात आलेल्या दिनांकापासून पुढे १८ (अठरा) महिन्यांच्या कालावधीसाठी अथवा त्यांच्या नोंदणी झालेल्या दिनांकापासून/तात्पुरता प्रवेशाच्या (Provisional Admission) दिनांकापासून शोधनिबंध सादर करण्याच्या तारखेपर्यंत, यामध्ये जे प्रथम घडेल तोपर्यंत शिष्यवृत्ती देण्यात येईल.

२) पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी सन २०१३—१४ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नावनोंदणी झालेल्या दिनांकापासून/तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) देण्यात आलेल्या दिनांकापासून पुढे चार वर्षांच्या कालावधीसाठी शिष्यवृत्ती देण्यात येईल.

३) प्रत्येक विद्यार्थ्याची हजेरी दरमहा ७५ टक्के असणे आवश्यक आहे, विद्यार्थ्याची हजेरी त्याचे मार्गदर्शक व संबंधित प्राचार्य/संचालक यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

४) पीएच.डी. व एम. फिल. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. /एम. फिल. साठी आवश्यक असणारे सर्व नियम व अटी बंधनकारक राहतील.

५) पीएच.डी./एम. फिल. साठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना अन्य कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही.

६) एम. फिल. अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची पूर्णवेळ नोंदणी होणे आवश्यक आहे.

26/3/2014

सहा. कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : शै. प्रवेश/९९३
दिनांक : २६/०३/२०१४

# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ : शै.प्रवेश/९९४ दिनांक:२६/०३/२०१४

प्रति,
मा. संचालक/प्राचार्य
पुणे विद्यापीठाशी संलग्न सर्व मान्यताप्राप्त संशोधन केंद्र,

विषय : एम.फिल./पीएच.डी. शिष्यवृत्ती बाबत.

महोदय/महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानूसार एम.फील/पीएच.डी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. सोबत नियम व अटीचे परिपत्रक जोडत आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०१३—१४ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह व प्राचार्य/संचालक यांच्या शिफारशीसह शैक्षणिक प्रवेश विभागाकडे सादर करावेत.

सोबत अर्जाचा विहित नमुना जोडला आहे. शिष्यवृत्तीची आवेदन पत्रे खाली नमूद केलेली माहिती यादी सह स्वतंत्ररित्या पाठवावी.

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | प्रवेश दिनांक |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

एम.फील/पीएच.डी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. विद्यार्थ्यांने एम.फील/पीएच.डी अभ्यासक्रमास शैक्षणिक बर्ष २०१३—१४ मध्ये प्रवेश घेतलेला असावा.
२. विद्यार्थ्याने इतर कोणत्याही दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा.
३. विद्यार्थी हा मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती वगळता इतर शिष्यवृत्ती किंवा आर्थिक लाभ उदा. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचे मानधन घेत नसावा.
४. विद्यार्थी पूर्ण वेळ किंवा अर्ध वेळ नोकरी करीत नसावा.
५. पालकांचे वार्षिक उत्पन्न रू. २ लाख पेक्षा अधिक नसावे त्या संदर्भात तहसिलदाराचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल.

६. विद्यार्थ्याने तीन वर्षात एम.फील पूर्ण करावे तसे अभिवचन त्यांच्याकडून रू. १०० च्या स्टॅम्पपेपरवर लिहून घ्यावे.

७. विद्यार्थी हा नियमित उपस्थित राहिला पाहिजे.

मा. संचालक/प्राचार्च, मान्यताप्राप्त संशोधन केंद्र यांनी पात्र विद्यार्थ्यांचे आवश्यक त्या कागदपत्रासह विहित नमुन्यातील अर्ज परीपूर्ण व अचूकपणे भरून शैक्षणिक प्रवेश विभागाकडे दि. १० एप्रिल २०१४ पर्यंत प्रत्यक्ष सादर करावे.

कळावे.

आपला,

सहा. कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग